मंगरुळपीर ठाणेदार आणि ग्रामसेवक यांच्या पुढाकाराने गरीब कुटुंबाला किराणा वाटप दि. १३/०४/२०२०

# गरिब कुटूंबाला किराणा वाटप



गरिब कुटुंबाला जीवनावश्यक वस्तु देवून मदत करताना ठाणेदार ,ग्रामसेवक व कर्मचारी

**मंगरुळपीर ■ तालुका प्रतिनिधी**

कोरोना विषाणूमुळे घरातील अन्नधान्य संपलेल्या व निर्धन कुटूंबाला ठाणेदाऱ्यांच्या साह्याने मदत म्हणून किराणा व अर्थसाहाय्य देण्यात आले.

शारीरिक व्याधीमुळे शहरातील संभाजीनगर मधील एका गरीब कुटुंबातील कर्ता माणूस आजारी असल्याने व लॉकडाऊन मुळे रोजगाराचे साधन ही नसल्याने उपजीविका

## ठाणेदार व ग्रामसेवकाचा पुढाकार

करिता घरातील जीवनावश्यक वस्तू संपल्यावर या गरिब कुटूंबाने ठाणेदार जगदाळे यांना आपबिती सांगितली. ठाणेदारांनी ग्रामसेवक सुरेश गावंडे यांना सांगितल्यावर त्यांनी या कुटूंबाकरिता संपूर्ण किराणा दिला, तर पत्रकार नंदलाल पवार यांनी त्यांना आर्थिक मदत दिली. यावेळी पोलीस विभागातील कर्मचारी यांची उपस्थिती होती.

ePaper देशोन्नती
Sun, 12 April 2020
https://deshonnati.digitaledition.in/c/509